**वि.दि.मु.नं.१४८/२०२३ (नि.६१ लगत)**

**उलटतपास शपथेवर सुरु**

**उलटतपास प्रतिवादी क्रं.११ व १२ तर्फे ॲड. श्री. एस. डी. खामकर**

१. हे म्हणणे खरे आहे की माझे वडील पांडुरंग यांना विश्वनाथ, विनायक व लक्ष्मण हे तीन भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की पांडुरंग हे किती तारखेला मयत झाले याची निश्चीत तारीख मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की विनायक यांनी सन १९६७ मध्ये त्यांचा हिस्सा अर्ज दाखल करुन प्रतिवादी क्रं.११ अनिल विनायक बागडे यांच्या नावावर करुन दिला. हे म्हणणे खरे आहे की लक्ष्मण यांच्या पत्नीचे नाव अंजनाबाई आहे व अजंनाबाई हिला मुलबाळ नव्हते. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकत ही एकत्र कुटूंबात खरेदी केलेली मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकतीत पांडुरंग, विनायक व लक्ष्मण यांचा समान हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की लक्ष्मण यांचा १/३ हिस्सा अंजनाबाई हिला मिळाला होता. हे म्हणणे खरे आहे की अंजनाबाई हिने तिला मिळालेला १/३ हिस्सा प्रतिवादी क्रं.१२ याच्या लाभात मृत्युपत्राने दिला होता. हे म्हणणे खरे आहे की वाटपाप्रमाणे प्रतिवादी क्रं.११ याला १/३ हिस्सा व प्रतिवादी क्रं.१२ यास १/३ हिस्सा दावा मिळकतीत आहे. हे म्हणणे खरे आहे की वहिवाटीवरुन वाद निर्माण झाल्याने प्रतिवादी क्रं.११ व १२ यांच्याविरुद्ध मी दावा क्रं.११९/२०१० हा दाखल केला. हे म्हणणे खरे आहे की दावा प्रलंबीत असतानाच दुर्घटना झाली व सदर मिळकत जमीनदोस्त झाली. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकतीचे अस्तीत्व संपुष्टात आल्याने त्या मिळकतीत पुन्हा १/३ हिस्सा वाटप करुन मिळावा म्हणुन मी हा दावा दाखल केला आहे.

२. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र.११ व १२ आणि माझ्यामध्ये हा दावा सोडुन अन्य कोणताही दावा प्रलंबीत नाही. हे म्हणणे खरे आहे की सरतपासातील परिच्छेद क्रं.४ मधील नमुद असलेला दावा क्रं.३२३/१९८३ मध्ये विनायक यांच्या वारसांना सामील केलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की अंजनाबाई हिच्या मृत्युपत्राबाबत माझी

कोणतीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की मोकळया जागेमध्ये हिस्सा निश्चीत होत नाही व पुढचे बांधकाम करता येत नाही म्हणुन मी त्या मिळकतीचे वाटप करुन मागितले.

**उलटतपास प्रतिवादी क्रं.६ ते १० तर्फे ॲड. श्री. जी. एल. पवार**

(प्रतिवादी वकिलांचे तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.)

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई.
दिनांक :०३.०२.२०२६

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
वाई.